ठाणे, गुरुवार दि. ११ जुलै २०२४ वर्ष : १३, अंक : ७४ , पाने : ४, किंमत : २ रुपये Maharashtra Samrat Maharashtra Samrat dainikmahasamrat@gmail.com Reg. No. THC/58/2024-2026

सम्राट अनेक परंतु बातम्यांचा एकच!®

# दैनिक महाराष्ट्र सम्राट

मुंबई, मुंबई उपनगर, ठाणे, नवी मुंबई, रायगड, पालघर, पुणे संपादक : चंद्रकांत भोईटे

अग्रलेख

**नसता खटाटोप**

देशातील गर्भश्रीमंत उद्योगपती मुकेश अंबानी यांचे सुपुत्र अनंत अंबानीच्या लग्नसोहळ्याची सर्वत्र धूम सुरू आहे. मुंबईतील अँटिलिया या निवासस्थानी सेलिब्रिटींसह विविध क्षेत्रातील मान्यवरांची उपस्थिती पाहायला मिळत आहे. त्यामध्ये, राजकीय नेत......पान २ वर



**मराठा आरक्षणाची सुनावणी ऑगस्टपर्यंत तहकूब**

...पान ३ वर

मित्रहो, शून्यातून विश्व निर्माण करणारे हे शिंदे दाम्पत्य असून, मोडेल पण वाकणार नाही, हा क्षत्रिय बाणा जपणारी ही आदर्श जोडी आहे. जीवनाच्या प्रारंभी नगरसेवक अन् आता मुख्यमंत्री या सर्वोच्च पदापर्यंत पोहोचतांना ज्या काही अडचणी, संकटे आली, त्यांना समर्थपणे तोंड देत, त्यावर मात करण्यात शिंदेसाहेबांना सौ. लताजींची मोलाची साथ लाभली. त्यामुळे शिंदेसाहेबांना आजमितीपर्यंत राजकारणातून समाजकारण करणं सुकर झालं आहे. म्हणूनच म्हणतात ना, हर कामियाब इंसान के पिछे औरत का हाथ होता है.

# भाईंची सावली, कृतिशिल जाबांज वहिनीसाहेब



संकल्पना : गणेश भोईटे (संपादक)

सौ. लताजींच्या गुणवैशिष्ट्यांवर प्रकाश टाकला तर,'त्या' साहसी, कष्टाळू, मनमिळावू, मितभाषी तथा महिला उत्कर्षासाठी झटणाऱ्या, जनसंपर्कची आवड असणाऱ्या, संकटसमयी गोरगरिबांच्या मदतीला धावून जाणाऱ्या कृतिशील जाबांज महिला-भगिनी-माता आहेत. इतकेच नव्हे तर, सुख-दुःखामध्ये भक्कम पाठबळ देणाऱ्या 'त्या' शिंदेसाहेबांच्या खऱ्या अर्थानं 'सावली' आहेत. सुरुवातीच्या संघर्षाच्या काळामध्ये ठाण्यात एका चाळीत तब्बल तीस वर्षे राहून सासू-सासरे, मुलं, दिर असा संसाराचा गाडा त्यांनी यशस्वीपणे हाकला. दरम्यान अनेक अडचणी, संकटे आलीत, पण त्यांना न डगमगता 'त्या' सामोरे गेल्या.आयुष्यात 'त्या' कधी हतबल होऊन थांबल्या नाहीत, डगमगल्या नाहीत वा मागे वळून पाहिलं नाही. कुटुंबाच्या सर्व जबाबदाऱ्या आत्मविश्वासाने पार पाडल्या. एकत्र कुटुंबाचा खर्च भागविण्यासाठी लतावहिनी ह्या शंभरहून अधिक लोकांना जेवणाचे डबे बनवून देत, घरगुती खानावळ चालविली. ह्या सर्व कष्टांचे फळ म्हणजे आज समस्त शिंदे परिवाराला समृद्धी-सन्मान व वैभवाचे दिवस पहावयास मिळत आहेत. त्यामुळेच 'आईला परम दैवत' म्हटलं जातं.

## वाढदिवसानिमित्त सौ.लताजी एकनाथ शिंदे यांचे राज्यातील समस्त शिवसैनिकांतर्फे अभिष्टचिंतन

सुपुत्र श्रीकांत दादांनी डॉक्टर होऊन गोरगरीब, निर्धन, गरजू रुग्णांची सेवा करावी, हे लताजींचे स्वप्न होते अन् ते मनापासून अभ्यास करून दादांनी सार्थक केलं. मुलाने आपल्या आईचं स्वप्न साकार करून आपलं कौटुंबिक कर्तव्य बजावलं.आज श्रीकांतदादा डॉक्टरसह खासदार होऊन शिवसेना वैद्यकीय मदत कक्ष आणि डॉ.श्रीकांत शिंदे फाउंडेशन या सेवाभावी संस्थांच्या माध्यमातून तनमनधनाने रुग्णसेवा करत आहेत,याचा आम्हा शिवसैनिकांना सार्थ अभिमान आहे.महत्वाचे म्हणजे कोरोना काळात त्यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आलेली रुग्णसेवा ही राज्यासह देशाला रोल मॉडेल ठरली, याचं कौतुक करावं तेवढं कमीच आहे.अखेर सौ. लताजी एकनाथराव शिंदे यांच्या सुपुत्राने वैद्यकीय क्षेत्रात मोलाची कामगिरी केली, जी युवा पिढीसाठी पथदर्शक आहे. खरं तर, हीच खरी आईची पुण्याई असते, जी मुलाचं भवितव्य घडविते.

मध्यंतरीच्या काळात पोटच्या दोन मुलांचा दुर्दैवाने अपघाती मृत्यू झाल्याने सातारच्या शिंदे परिवारावर आभाळाएवढं मोठं संकट कोसळले होतं.सर्वकाही काळानं हिरावून घेतलं की काय,असं कुटुंबियांना क्षणिक वाटत होतं.पण काळजावर दगड ठेवत, मोठ्या धैर्याने-संयमाने लताजींनी परिस्थिती हाताळून शिंदेसाहेबांना मोठा मानसिक आधार दिला. महत्वाचे म्हणजे लहान- मोठ्या सर्वच कौटुंबिक सदस्यांचे मनोबल शाबूत ठेवण्यासाठी पत्नी अन् माता या नात्याने त्यांनी मोठी भूमिका बजावली. यास्तव आम्ही त्यांना त्रिवार वंदन करतो. शिवसैनिकांची माता, बहीण, वहिनी या त्रिवेणी नात्याने जीवन मार्गक्रमित करणाऱ्या सौ. लताजींना पुढील आयुष्य अधिकाधिक आरोग्यवर्धक, सुखी-समृद्ध व आनंददायी जावो, हीच आमची सर्वांची सदिच्छा! नारी शक्तीला मानाचा मुजरा! जय महाराष्ट्र!

**- रणवीरसिंह राजपूत**
ठाणे/नंदुरबार (मो.न.९९२०६७४२१९)



# संपादकीय...



संपादक–चंद्रकांत भोईटे

## नसता खटाटोप

देशातील गर्भश्रीमंत उद्योगपती मुकेश अंबानी यांचे सुपुत्र अनंत अंबानींच्या लग्नसोहळ्याची सर्वत्र धूम सुरू आहे. मुंबईतील अँटिलिया या निवासस्थानी सेलिब्रिटींसह विविध क्षेत्रातील मान्यवरांची उपस्थिती पाहायला मिळत आहे. त्यामध्ये, राजकीय नेते, चित्रपट तारे – तारका आहेत. शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांच्या पत्नी रश्मी ठाकरे आणि मुलगा तेजस ठाकरेही अंबानीच्या लग्नसोहळ्याला पोहोचले होते. त्यानंतर, तेजस ठाकरे यांचा या लग्नसोहळ्यात डान्स करतानाचा व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाला आहे. विशेष म्हणजे भाजपच्या नेत्यांनीही हा व्हिडिओ शेअर करत शिवसेना आणि ठाकरे कुटुंबीयांना टार्गेट केले आहे. उद्योगपती किंवा कोणी सेलिब्रिटी असेल तर सर्व राजकारणी मतभेद सोडून त्यांच्या कार्यक्रमाला जातात. पण भाजपाला हे कसे आवडेल. त्यांनी ठाकरे घराण्यावर नेहमीप्रमाणे टीका केली.

आता, भाजपच्या या टीकेला शिवसेना उपनेत्या सुषमा अंधारे यांनी तिखट शब्दात उत्तर दिले आहे. भाजप मुंबईचे अध्यक्ष आशिष शेलार यांच्यावर त्यांची खोचक टीका केली. अंबानींच्या लग्नानिमित्त राजकारण्यांच्या एकमेकांवर लाथाळ्या मारण्याचे फालतू काम सुरू झाले आहे. महाराष्ट्रात कुठल्याही गोष्टीचे भांडवल करून आपली चर्चा काशी करून घ्यायची याची चटक भाजपाच्या काही नेत्यांना लागली आहे, असे म्हणता येईल.

अंबानींच्या लग्नातील डान्स सोहळ्यात तेजस ठाकरे डान्स करताना दिसून आले. त्यांचा हा व्हिडिओ समाजमाध्यवांवर व्हायरल झाल्यानंतर भाजप नेत्यांनी टीकेची संधी सोडलीच नाही. जो मराठी तरुण गोविंद रे गोपाळा म्हणत दहिहंडीत नाचताना कधी दिसला नाही. तो महाराष्ट्राचा उमदा तरुण चेहरा अंबानींच्या लग्नात शेवटच्या रांगेत उभे राहून नाचताना दिसला, अशी खोचक टीका भाजप आमदार आमदार आशिष शेलार यांनी केली होती. भाजपच्या टीकेला शिवसेना समर्थकांनीही अमृता फडणवीसांचे नाव घेत प्रतिहल्ला केला आहे. आता, सुषमा अंधारे यांनीही ट्विट करुन अमृता फडणविस यांचे नाव घेत आशिष शेलार यांच्यावर तिखट शब्दात खोचक टीका केली.

सुषमा अंधारे यांनी म्हटले आहे की, तोरणादारी/मरणादारी वैर मनात ठेवू नये म्हणतात. असो. हे समजायला संस्कार लागतात. ज्याची तुमच्याकडे वानवा आहे.अमृतावहिनी जशा राजकारणात नाहीत, त्यांना वैयक्तिक आयुष्य जगण्याचा अधिकार आहे तसेच आहे ते, असा पलटवार सुषमा अंधारे यांनी केला आहे. तसेच, तुम्हाला भांडी घासायलाही बोलावले नाही का?, असा सवालही आशिष शेलार यांना टॅग करुन सुषमा अंधारे यांनी विचारला आहे. दरम्यान, सुषमा अंधारेंच्या या तिखट, खोचक टीकेमुळे भाजपा–शिवसेनेत आणखी शाब्दीक खडाजंगी होण्याची शक्यता आहे. हे शाब्दिक बिनअर्थाची लढाई शिवसेना – भाजपामध्ये सुरू झाली आहे. आशिष शेलारांनी एक्स पोस्ट करत तेजस ठाकरेंच्या डान्सवर टीका केली. त्यामध्ये त्यांनी म्हटले की, जो हा भन्नाट नृत्य अविष्कार पाहून महाराष्ट्रातील तमाम मराठी माणसाच्या काळजात धकधक झाले. असो हे नृत्य पण कसे जगविख्यात, गरजेचे आणि जीवनावश्यक..वगैरे वगैरे आहे, हे आता त्या तरुणाचे संजयकाका महाराष्ट्राला पटवून देतीलच...! आशिष शेलारांनी खालच्या पातळीवर तेजस ठाकरेंवर टीका करणे योग्य नव्हते. कारण तेजस राजकारणी नाही. परंतु उद्धव ठाकरेंना तेजसच्या आडून चार शब्द सुनावण्यासाठी शेलारांचा हा नसता खटाटोप आहे असे वाटते. भाजपचे आमदार नितेश राणे यांनी तेजस ठाकरेंवर टीका केली आहे. त्यांनी म्हटले की, अनंत अंबानीच्या लग्नात नाचणाऱ्या तेजस ठाकरेला आता नाच्या ठाकरे नाव द्यावे. यावर आदित्य ठाकरेंनी उत्तर देत म्हटले की, राणेंना सायकॉलॉजी मदतीची खूप गरज आहे. अशाप्रकारे शिवसेना ठाकरे गट आणि भाजपात वाकयुद्ध सुरू झाले आहे. ही लढाई नेहमीच सुरू असते. पूर्वी भाजपाचे नेते चंद्रकांत पाटील वादात तोंड घालायचे, आता ते शांत असतात. पण आशिष शेलार वगैरे मंडळी त्यांची जागा चालवतात. सत्ताधारी पक्षातील काही नेत्यांच्या वाचाळपणामुळे त्यांची जनतेत प्रतिष्ठा राहिलेली नाही. दुसऱ्याच्या लग्नात आपण ठळकपणे उठून दिसावे, माध्यमांत चर्चेत यावे यासाठी नसता खटाटोप काही राजकीय नेत्यांचा दिसतो हे राज्याच्या प्रतिष्ठेसाठी नक्कीच योग्य नाही.

## 'रस्त्याच्या मालकीविषयी स्पष्टता, संसाधनांचे एकत्रीकरण आणि कमीत कमी कालावधीत रस्ते दुरुस्ती या त्रिसूत्रीने सर्व यंत्रणांनी काम करावे'

■ **महापालिका आयुक्त सौरभ राव यांनी दिले निर्देश**

■ **घोडबंदर रोडचा घेतला आढावा**

ठाणे – पावसाळ्यात रस्ते खराब होऊन त्यावर पडलेले खड्डे दुरुस्त करताना कमीत कमी वेळेत प्रतिसाद दिला गेला पाहिजे. त्यासाठी महापालिकेसह सर्व यंत्रणांनी एक टीम बनून काम करावे. संसाधने, मनुष्यबळ, रस्त्याची मालकी, कामाची जबाबदारी यापैकी कोणतीही अडचण त्यात येऊ नये, असे स्पष्ट निर्देश ठाणे महापालिका आयुक्त सौरभ राव यांनी दिले आहेत. रस्त्याच्या मालकीविषयी स्पष्टता, संसाधनांचे एकत्रीकरण आणि कमीत कमी कालावधीत रस्ते दुरुस्ती या त्रिसूत्रीने आपण सगळ्यांनी एकत्रित काम करून आपले क्षेत्र खड्डेमुक्त करूया, असे आयुक्त राव यांनी स्पष्ट केले आहे.

पावसाळ्यातील रस्ते स्थितीचा, विशेषत: घोडबंदर रोडचा, आढावा घेण्यासाठी बुधवारी सकाळी ठाणे महापालिका आयुक्त सौरभ राव यांच्या दालनात सर्व यंत्रणांच्या विभागप्रमुखांची बैठक झाली. या बैठकीत, ठाणे महापालिकेचे नगर अभियंता प्रशांत सोनाग्रा, महापालिकेचे कार्यकारी अभियंता संजय कदम, सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधिक्षक अभियंता सिद्धार्थ तांबे, कार्यकारी अभियंता सुनील पाटील, मुंबई महानगर प्रदेश प्राधिकरणाचे अधिक्षक अभियंता विनय सुर्वे, कार्यकारी अभियंता गुरुदास राठोड, मेट्रोचे समन्वयक जयंत डहाणे, कायर्कारी अभियंता सुरेंद्र शेवाळे आणि अतुल पाटील आदी अधिकारी उपस्थित होते.

आनंद नगर चेक नाका ते गायमुख या पट्ट्यातील पूर्व द्रुतगती महामार्ग आणि घोडबंदर रोड यावरील रस्त्याचे कोणते भाग कोणाकडे आहेत, तसेच, त्यावरील कोणत्या मार्गिकेत कोणाचे काम सुरू आहे, उड्डाणपूलांची जबाबदारी कोणाची आहे या विषयीची स्पष्टता येण्यासाठी सर्व यंत्रणांनी एकत्र बसून नकाशावर त्याचे रेखांकन करावे. त्यातून रस्त्याविषयी स्पष्टता येईल आणि संदिग्ध स्थिती होणार नाही, असे आयुक्त राव यांनी स्पष्ट केले.

त्याचबरोबर, पावसाळ्यात रस्ते दुरुस्तीच्या कामासाठी सर्व यंत्रणांची संसाधने, मनुष्यबळ हे एकाच यंत्रणेचा भाग आहेत. त्यामुळे एकमेकांना सहाय्य करून रस्ता कमीत कमी वेळात दुरुस्त करणे हेच आपले मुख्य उद्दीष्ट आहे. याचा पुनरुच्चार आयुक्त राव यांनी केला.

या बैठकीत, घोडबंदर सेवा रस्ता कामातील अडचणी, भाईंदरपाडा येथील मलनि:सारण वाहिनीचे काम, नागला बंदर परिसरातील मेट्रोच्या कामामुळे आवश्यक असलेली रस्ते दुरुस्ती आणि आनंद नगर चेक नाका येथील रस्त्याची स्थिती आणि त्यावरील तांत्रिक उपाययोजना याबद्दल चर्चा झाली.

## मराठा आरक्षणाची सुनावणी ऑगस्टपर्यंत तहकूब

**(पान १ वरून)** ५ ऑगस्टपासून पुढील नियमित सुनावणी सुरू होणार आहे. मराठा आरक्षणाबाबत प्रतिज्ञापत्र सादर करण्यासाठी मागास आयोगाला आणखी मुदतवाढ हवी आहे. आयोगाचे वकील सध्या परदेशात असल्याने आयोगाच्यावतीने कोर्टाकडे याबाबत विनंती करण्यात आली होती. त्यानंतर, तीन आठवड्यांत राज्य मागासवर्ग आयोगाने आपली भूमिका स्पष्ट करावी, असे निर्देश न्यायालयाने दिले आहेत. त्यामुळे, पुढील तीन आठवड्यापर्यंत राज्य मागासवर्गीय आयोगाला मुदतवाढ मिळाल्याचं दिसून येते. तर, आयोगाने मांडलेल्या भूमिकेवरील प्रतिज्ञापत्रावर इतर सर्व प्रतिवाद्यांना १० दिवसांत उत्तर देण्याचे निर्देशही हायकोर्टाकडून देण्यात आले आहेत. त्यामुळे, आता ऑगस्टपर्यंत न्यायालयाने मराठा आरक्षणाच्या मुद्द्यावर वादी व प्रतिवादींना म्हणणे मांडण्यास अवधी दिला आहे. त्यानंतर, न्यायालयाची नियमित सुनावणी सुरू होणार आहे.

## आरोपी मिहीर शाहाला १६ जुलैपर्यंत पोलीस कोठडी

**(पान १ वरून) नेमक काय म्हणाले एकनाथ शिंदे?–** वरळी हिट अँड रन प्रकरणातील दोषींवर कारवाई करण्याचे तसेच जे पब आणि बार रात्री उशीरापर्यंत चालतात, त्यांच्यावर कारवाई करण्याचे आदेश मी पहिल्या दिवसांपासूनच दिले आहेत. पुण्याच्या प्रकरणातही मी अशाचप्रकारे आदेश दिले होते. त्यानंतर झालेली कारवाई सर्वांनी बघितली. वरळीच्या प्रकरणातही कारवाई सुरू आहे. जे अवैध काम करतील, त्यांच्यावर कारवाई केली जाईल, असं मुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले.

पुढे बोलताना, पीडित कुटुंबाला आर्थिक कुटुंबाला आर्थिक मदत देणार का? असं विचारलं असता, आम्ही पीडित कुटुंबाच्या बरोबर आहोत. ते आमच्याच परिवारातील सदस्य आहेत. त्यांना जी काही मदत लागेल, मग ती कायदेशीर असो, किंवा आर्थिक असो, त्यांना मदत केली जाईल. त्यांना मुख्यमंत्री सहायता निधीतून १० लाख रुपयांची आर्थिक मदत दिली जाईल, अशी घोषणा त्यांनी केली.

**राक्षस मिहिरला कोळीवाड्यात भरचौकात सोड–आदित्य –** मुंबई – वरळीतील हिट अँड रनच्या घटनेत मृत्युमुखी पडलेल्या कावेरी नाखवा यांच्या कुटुंबीयांची शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे स्थानिक आमदार आणि माजी मंत्री आदित्य ठाकरे यांनी सांत्वनपर भेट घेतली. नरकातून राक्षस आला तरी तो इतकं भयंकर कृत्य करणार नाही, इतकी बेकार हिट अँड रनची केस असल्याचं आदित्य ठाकरे म्हणाले. त्यांच्यासोबत काँग्रेस नेते अस्लम शेखही होते.

कावेरी नाखवा यांचे पती, मुलगी यांची भेट घेतल्यानंतर आदित्य ठाकरेंनी माध्यमांशी संवाद साधला. माझ्याकडे शब्द नाहीत, त्यांना भेटल्यावर मन हलून जातंय. अपघात होत असतात, पण इतकी बेकार हिट अँड रनची केस.. मी तर म्हणेन हा मर्डरच आहे. त्याला शिक्षा ही कठोरात कठोर झाली पाहिजे. आपण जर त्या परिवाराच्या डोळ्यात पाहिलं तर मनातला राग, दुःख दिसतंय. नाखवाजींनी तर त्यांच्या डोळ्यासमोर पाहिलंय. अशा भावना आदित्य ठाकरेंनी व्यक्त केल्या.

इतकी भीतीदायक, भयानक गोष्ट आपल्या महाराष्ट्रात, मुंबईत होऊ शकते. नरकातून राक्षस आला तरी तो असं करणार नाही, इतकी बेकार हिट अँड रनची केस आहे. मी कालही मागणी केली होती, की अनेक जण म्हणतील नुकसान भरपाई वगैरे.. पण नाखवा कुटुंबाला एक रुपया नकोय, त्यांना आरोपीला शिक्षा झालेली बघायची आहे. तो मिहीर शहा थांबला असता, तरी एक जीव वाचला असता. त्याने ज्या प्रकारे फरफटत नेलं, ते खूप भयानक आहे. लवकरात लवकर हा खटला फास्ट ट्रॅक कोर्टात चालायला हवा. कठोरात कठोर शिक्षा व्हायला हवी. मी तर म्हणतो त्याला कोळीवाड्यात भरचौकात सोडा असंही आदित्य ठाकरे म्हणाले.

## दिव्यांगांचे अनुदान वितरित करण्याबाबत आयुक्त सकारात्मक

**(पान १ वरून)** खासदार नरेश म्हस्के यांना निवेदन सादर केले होते. खासदार नरेश म्हस्के हे ठाणे महापालिकेत सभागृह नेता असताना त्यांच्या संकल्पनेतून महिला व बालकल्याण समितीच्या विविध योजना तसेच दिव्यांग कल्याणकारी योजनांमध्ये नवीन योजनांची सुरूवात करुन त्याची अंमलबजावणी केली होती. या महत्वाकांक्षी योजनांची नोंद राज्यातील इतर महापालिकांनी घेवून त्यांनी देखील अशा योजना राबविण्यास सुरूवात केली आहे.

या दोन्ही योजनांचा फायदा ठाणे शहरातील अनेक गरीब व गरजू नागरिकांना होत आहे. दिव्यांग व्यक्तींसाठी मोफत घरे वाटप करणे, स्वयंरोजगाराची साधने उपलब्ध करुन देणे अशा अनेक विविध योजना महापालिकेने राबविल्या असून याची नोंद संपूर्ण राज्याने घेतली होती. परंतु अचानकपणे अनुदानाची रक्कम बंद केल्यामुळे दिव्यांग व्यक्तींसमोर उदरनिर्वाहाचा प्रश्न उभा राहिला आहे. आज महापालिका आयुक्त सौरभ राव यांच्यासमवेत झालेल्या चर्चेत खासदार नरेश म्हस्के यांनी दिव्यांगाच्या समस्या मांडून त्यांना न्याय मिळण्याच्या दृष्टीने चर्चा केली. तसेच महिला व बालकल्याण समितीमार्फत राबविण्यात येणाऱ्या योजनाही राबवाव्यात असेही आयुक्तांना सांगितले. चर्चेअंती आयुक्तांनी दिव्यांग कल्याणकारी योजना आणि महिला व बालकल्याण समितीतर्फे राबविण्यात येणाऱ्या योजनांबाबतही निर्णय घेवून त्याची त्वरीत अंमलबजावणी केली जाईल असे नमूद केले.

या बैठकीस अतिरिक्त आयुक्त १–संदीप माळवी, अतिरिक्त आयुक्त २ – प्रशांत रोडे, धर्मवीर दिव्यांग सेनेचे अध्यक्ष गिरीष मेहरोल, सचिव शरद पवार व इतर पदाधिकारी व सदस्य उपस्थित होते. खासदार नरेश म्हस्के यांनी दिव्यांग व्यक्तींसाठी पुढाकार घेवून आयुक्त यांच्याशी चर्चा करुन या बैठकीत दिव्यांगाच्या योजनांबाबत सकारात्मक निर्णय घेतल्याबद्दल दिव्यांग बांधवांनी सर्वांचे आभार व्यक्त केले.

## ठाण्यात स्वाईन फ्ल्यूचे तब्बल ७० रुग्ण

**(पान १ वरून)** त्यापेक्षा काळजी घेणं गरजेचं आहे. याशिवाय मास्करचा वापर करावा आणि खोकताना किंवा शिंकताना तोंडावर रुमाल ठेवावा. आपले हात वारंवार स्वच्छ पाण्याने धुवावे, असे अनेक उपाय या आजारावर आहेत.

## मुरबाड तालुक्यात ४० गाव/ पाडे टँकरमुक्त

**(पान १ वरून)** निरगुडपाडा (फागूळगव्हण), चासोळे (बु), तळवली, कोरावळे, तळ्याचीवाडी, सोगांळवाडी (रामपुर), मेंगाळवाडी (रामपुर), शिंदीपाडा, नांदेणी, सासणे, चिल्हरवाडी, खापरी, शेलगाव, जानपाटलाचापाडा ही ४० गाव/ पाडे शाश्वत जल स्त्रोताच्या मदतीने कायमसाठी टँकरमुक्त करण्यात यश मिळाले आहे. जिल्ह्यातील गाव/पाडे टँकरमुक्त करण्यासाठी प्रशासन प्रयत्नशील आहे.

## सर्व प्रभारी पदावरील अधिकाऱ्यांना मूळ पदावर आणा

■ **अतिरिक्त वेतनाची वसुली करा**

■ **महाराष्ट्र म्युनिसिपल कर्मचारी युनियनची मागणी**

ठाणे – ठाणे महानगर पालिकेत सध्या सर्वच विभागांमध्ये प्रभारी अधिकाऱ्यांची चलती निर्माण झाली आहे. लिपीकांना थेट सहाय्यक आयुक्त ते उपायुक्तपदाचा प्रभारी पदभार सोपविण्यात आला आहे. त्यातून ठाणे महानगर पालिकेचे नुकसानच होत आहे. त्यामुळे सर्व प्रभारी अधिकाऱ्यांना मूळ पदावर आणून त्यांच्याकडून अतिरिक्त वेतनाची रक्कम वसूल करावी, अशी मागणी महाराष्ट्र म्युनिसिपल कर्मचारी युनियनचे अध्यक्ष रवींद्र शिंदे यांनी केली आहे. या मागणीसाठी ते स्वातंत्र्य दिनी उपोषणाला बसणार आहेत.

महाराष्ट्र म्युनिसिपल कर्मचारी युनियनचे अध्यक्ष रवींद्र शिंदे यांनी या संदर्भात ठामपा आयुक्त आणि जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन दिले आहे. त्यांनी दिलेल्या निवेदनामध्ये दादोजी कोंडदेव स्टेडियमचे उदाहरण दिले असून या ठिकाणी नियुक्त असलेल्या अधिकारी लिपीक या संवर्गातील आहेत. मात्र, राजकीय वरदहस्त असल्याने त्यांना ही बढती दिली आहे, असा आरोप केला आहे. ठामपातील अनेक अधिकारी हे लिपीक असून त्यांना सहाय्यक आयुक्त तसेच प्रभारी उपायुक्तपदाचा पदभार देण्यात आला आहे. त्यातून ठाणे महानगर पालिकेचे आर्थिक नुकसान होत आहे. शिवाय, स्पर्धा परीक्षा न देता हे अधिकारी मोक्याच्या जागांवर बसलेले असल्याने धोरणात्मक निर्णय घेणे त्यांना शक्य होत नाही. परिणामी ठाणेकरांच्या करातून जमा झालेल्या पैशाचा अपव्यय होत असल्याने त्या प्रभारींना मूळ पदावर आणावे. अन्यथा, येत्या १५ ऑगस्ट रोजी आपण जिल्हाधिकारी कार्यालयासमोर उपोषणाला बसणार आहोत, असा इशारा शिंदे यांनी दिला.

Public Trusts Registration Office, Thane
Address: 1st Floor,Lilly Apt, Parsi Agari Lane
Tembi Naka Thane (w)- 400601

**Public Notice**

Service Request Number : THN/01347/18/24
Inquiry/case No. : ACC I / 263 / 2024
Name of the Trust : ईम्मानुएल प्रार्थना चेरिटेबल ट्रस्ट
**Address of the Trust : रूम नं. २, भालेराव चाळ, शहाजी किरणा स्टोअर्सच्याजवळ, परेरा नगर, लोकमान्य नगर, पाडा नं. ०३, ठाणे (डब्ल्यू)ठाणे, ठाणे, ठाणे**
**Name of the Applicant : श्री. प्रशांत छबुराव भालेराव**

To
**All Concerned having interest**
Whereas in the above application under section 19 of the Maharashtra Public Trust Act 1950, an enquiry is to be made under section 19 of the said Act, on the following points by the Asst. Charity Commissioner, Thane.

1. Whether a Trust in the respect of the above exists and whether such Trust is a public Trust?
2. Whether any of the following properties are the properties of such Trust?

**Movable Property**

| SR | Property Details | Estimated Value |
|---|---|---|
| 1 | Cash In Hand | 1000.00 |

**Value of Movable Property :** Rs. 1000/- Only (In Words Rs. One Thousand Only)

**Immovable Property**

| SR NO | Town Or Village | CS Or Municipal Or Survey No | Area | Assessment Or Judiciary | Tenure Or Nature | Estimated Value |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | Nil | Nil | Nil | Nil | Nil | 0.00 |

Value of Immovable Property : Rs. 0/- Only (In Words Rs. Only)

This is to call upon you to submit your objections or any evidences if any, at the above office address within 30 days from the date of publication of this notice in written. If not received anything within given period, the inquiry would be completed & necessary orders will be passed. If no objections are received within the stipulated time then further inquiry would be completed and necessary orders will be passed.

This notice given under my hand and seal of the Office on this date 05/07/2024.

Stamp

Sign/-
Superintendent
Public Trusts registration Office,
Thane

**जाहीर नोटीस**

आम्ही १) सौ. सुजाता सुभाष कानडे आणि २) श्री. सुभाष पांडुरंग कानडे, दोघे राहणार: फ्लॅट नं. ७०३, ७वा मजला, एलिगन्स, दमानी इस्टेट, तीन हात नाका रोड, नौपाडा, ठाणे (प) ४००६०२ तमाम जनतेस या नोटीसद्वारे कळवितो की, आम्ही फ्लॅट नं. ७०३, ७वा मजला, एलिगन्स, दमानी स्टेट, तीन हात नाका रोड, नौपाडा, ठाणे (प) ४००६०२ ही सदनिका श्री तिरुपती डेव्हलपर्स तर्फे श्री. हरेश गुरुबक्श दौलतानी यांचेकडून खरेदी केलेली असून आमच्यामध्ये झालेला सदरहू सदनिकेचा नोंदणीकृत करारनामा ज्याचा दस्त अनु क्र. टनन-०२-५९६/२०१४, पावती क्र. ६७२, दिनांक २१/०१/२०२४ असा असून सदरहू मुळ नोंदणीकृत दस्त आमच्याकडून दिनांक ०६/०५/२०२४ रोजी १२.४५ वाजेच्या दरम्यान एलिगन्स, दमानी स्टेट, नौपाडा, ठाणे या परिसरामध्ये गहाळ झालेला आहे व तो शोधूनही सापडलेले नाहीत. सदर बाबत नौपाडा पोलीस ठाण्यात प्रॉपर्टी मिसींग रजि. नं. ११८८/२०२४, दिनांक ०९/०७/२०२४ कडे दाखल करण्यात आली आहे.

तरी वर नमुद कराराची मुळ प्रत कोणास सापडल्यास ती त्यांनी स्वाक्षरीकर्ता यांच्या खाली नमुद पत्त्यावर त्वरीत आणून द्यावी अथवा खाली नमुद मोबाईल क्रमांकावर संपर्क साधावा, ही विनंती.

सही/-

सौ. सुजाता सुभाष कानडे

श्री. सुभाष पांडुरंग कानडे
पत्ता: फ्लॅट नं. ७०३, ७वा मजला,
एलिगन्स, दमानी इस्टेट, तीन हात नाका रोड,
नौपाडा, ठाणे (प) ४००६०२
मो.नं. ९८२००९००४६

BHIWANDI NIZAMPUR CITY MUNICIPAL CORPORATION
BHIWANDI (Dist. Thane)
MAHARASHTRA
OLD S.T. STAND. KAP-ALI,
BHIWANDI - 421 302, DIST. THANE

भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका, भिवंडी,
जि.ठाणे, महाराष्ट्र,
जुना एस.टी.स्टॅण्ड, कापआळी
भिवंडी – ४२१ ३०२, जि. ठाणे

TEL : 02522- 55314/55315, FAX : 02522-25074

जा.क्र. /ज.सं.वि/७०३
दि. ११/०७/२०२४

**जाहीर नोटीस**

भिवंडी नि.शहर महानगरपालिका, भिवंडी याव्दारे तमाम नागरीकांना जाहीर नोटीसव्दारे कळवितो की, भिवंडी नि.शहर महानगरपालिका हद्दीतील मौजे निजामपुरा सि.स.नं. ७३२ मधील जागेत मनपाकडुन बांधकामाकरिता BNCMCB/442/2023/0016/AutoDCR,दि.२७/०२/२०२४ ने श्री उसामा अब्दुल कादीर मुल्ला व इतर ३ व्दारा : आर्कीटेक्ट मोईन नाखुदा असो. २५, सौदागर मोहल्ला, भिवंडी जि.ठाणे यांना दिलेल्या परवानगीनुसार कामाच्या मंजुर नकाशानुसार विकास कामात अडथळा निर्माण करणारे ०१ कडुनिंबाचे झाड काढणेची परवानगी मिळणे बाबत श्री उसामा अब्दुल काझी मुल्ला व इतर ३ व्दारा : आर्कीटेक्ट मोईन नाख़ुदा असो. रा. ४ था निजामपुरा घर नं. ५२, पटेल मस्जिद मागे, भिवंडी यांचा इकडील उद्यान आ.क्र./५२७, दि.०८/०७/२०२४ रोजी अर्ज प्राप्त झालेला आहे.

प्राप्त अर्जानुसार विकासीत कामाच्या ठिकाणावरील बांधकाम स्थळाची पाहणी केली असता उपरोक्त ठिकाणावरील अधिकृत विकास कामात कडुनिंब–०१ जातीचे झाड अडथळा निर्माण करत असल्याने सदर झाडासंदर्भात नियमानुसार कार्यवाही करावयाची आहे.

तरी महाराष्ट्र नागरी क्षेत्रे झाडांचे जतन अधिनियम १९७५ चे कलम ८.३ (क) नुसार सदरच्या जागे संबंधी व जागेवरील झाडे संबंधी कोणाचा आक्षेप हक्क अथवा हरकत असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिध्द झालेच्या तारखे पासुन ७ दिवसांच्या आत लेखी पुराव्यासह आमच्या कार्यालयात समक्ष सादर करावे. विहीत मुदतीमध्ये हरकत प्राप्त न झाल्यास महाराष्ट्र नागरी क्षेत्रे झाडांचे जतन अधिनियम १९७५ चे कलम ८ चे (३) नुसार पुढील कार्यवाही करण्यांत येईल व त्यानंतर कोणतीही हरकत ग्राहय धरली जाणार नाही. याची नोंद घ्यावी.

सही/–
(निलेश संखे)
वृक्षअधिकारी तथा उद्यान अधिक्षक
भिवंडी नि.शहर महानगरपालिका, भिवंडी

**जाहिर नोटीस**

तहसीलदार व शेतजमीन न्यायाधिकरण ठाणे, यांचे न्यायालयांत **मौजे डोमखार, तालुका व जिल्हा ठाणे,** येथील खालील वर्णन केलेल्या जमीनीबाबत **महाराष्ट्र कुळवहिवाट व शेतजमीन कायदा १९४८ चे कलम ७०(ब) अन्वये कुळ घोषित करण्याबाबत** दावा दाखल केला आहे.

**जमीनीचे वर्णन**

| गावाचे नाव | स. नं. | हि. नं. | क्षेत्र | आकार | अर्जदार व सामनेवाले यांचे नाव |
|---|---|---|---|---|---|
| मौजे डोमखार तालुका व जिल्हा ठाणे | ९ | – | १–९९–६०<br>पो.ख. ०–३८–४०<br>एकूण क्षेत्र २–३८–०० | १९–५० | श्री. गणेश गौरु टावरे.<br>रा. खाडी गांव, दिवा शिळ रोड, पो. डावले.<br>ता. जि. ठाणे ४०० ६१२<br>विरुध्द |
| | १० | – | २–१६–५०<br>पो.ख. ०–३९–२०<br>एकूण क्षेत्र २–५५–७० | १९–६९ | १. रवी को. ऑप. हौ. सोसायटी लि.<br>दिवा चे प्रमोटर<br>श्री. जयेश टी. शहा. |
| | १२ | – | २–४९–१०<br>पो.ख. ०–४३–००<br>एकूण क्षेत्र २–९२–१० | १३–३७ | रा. मौजे डोमखार, पो. डावले.<br>ता. जि. ठाणे ४०० ६१२<br>२. श्री. प्रभाकर आनंदराव दाभोळकर.<br>३. श्री. मंगेश आनंदराव दाभोळकर.<br>४. श्री. वासुदेव आनंदराव दाभोळकर.<br>५. श्री. वसंतराव आनंदराव दाभोळकर.<br>६. श्री. पदमन वासुदेव दाभोळकर.<br>७. श्रीमती. सुलोचना दिगंबर मुजुमदार.<br>८. श्रीमती. कमलिनी कमलाकर प्रभुझाटे.<br>९. श्रीमती. विमलबाई अरविंद वागळे.<br>१०. श्रीमती. विनिता अरविंद वागळे.<br>११. श्री. कैलास अरविंद वागळे.<br>१२. श्रीमती विमला सुमित्रा वागळे.<br>१३. श्री. प्रल्हाद वासुदेव दाभोळकर.<br>१४. श्री. गुरुनाथ वासुदेव दाभोळकर.<br>क्रं. २ ते १४, रा. मौजे डोमखार, पो. डावले,<br>ता. जि. ठाणे ४०० ६१२ |

वरील दाव्यातील प्रकरणी **सामनेवाले क्रं. २. श्री. प्रभाकर आनंदराव दाभोळकर व इतर १२, क्रं. २ ते १४, रा. मौजे डोमखार, पो. डावले, ता. जि. ठाणे – ४०० ६१२** यांना वरील पत्यावर नोटीस पाठविण्यांत आलेली आहे.

परंतु सामनेवाले हे तारखांना उपस्थित न झाल्याने ही जाहीर नोटीस प्रसिध्द करण्यात येत आहे. तरी सामनेवाले अथा त्यांचे कायदेशीर वारस अथवा अन्य कोणी हितसंबधीत इसमांनी सदर दाव्याकामी दि. १८/०७/२०२४ रोजी सकाळी ११.०० वाजता तहसीलदार ठाणे यांचे दालनात होणा–या सुनावणीच्या दिवशी स्वतः त्यांचे कायदेशीर सल्लागार यांनी दावा जमीनीबाबत सर्व संबधित कागदोपत्री पुराव्यासह उपस्थित रहावे. सदर दिवशी सामनेवाले पक्षकारांनी हितसंबंध दर्शविला नाही. तर त्यांना या दाव्याकामी स्वारस्य नाही. तसेच दाव्यामध्ये काहीही सांगावयाचे नाही असे गृहीत धरुन एकतर्फी सुनावणी घेवून नियमानुसार योग्य तो निर्णय देण्यांत येईल. याची नोंद घ्यावी.

क्रंमाक/कुळवहिवाट/७०(ब) /डोमखार/३५/२०२३
तहसीलदार कार्यालय, ठाणे.
दिनांक :- ०८/०७/२०२४

शिक्का

सही/–
(उमेश पाटील)
तहसीलदार व शेतजमीन न्यायाधिकरण, ठाणे

माझ्या सही शिक्यांनी नोटीस प्रसिध्द केली आहे.
प्रत. मा. जिल्हा माहिती अधिकारी, ठाणे
२/– सदरची जाहिर नोटिस स्थानिक वृत्तपत्रामध्ये प्रसिध्द करून प्रसिध्दीचा अहवाल पाठविणेस विनंती आहे.

सही/–
(उमेश पाटील)
तहसीलदार व शेतजमीन न्यायाधिकरण, ठाणे

ठाणे, गुरुवार दि. ११ जुलै २०२४ वर्ष : १३, अंक : ७४ , पाने : ४, किंमत : २ रुपये Maharashtra Samrat Maharashtra Samrat dainikmahasamrat@gmail.com Reg. No. THC/58/2024-2026

## अग्रलेख

### नसता खटाटोप

देशातील गर्भश्रीमंत उद्योगपती मुकेश अंबानी यांचे सुपुत्र अनंत अंबानींच्या लग्नसोहळ्याची सर्वत्र धूम सुरू आहे. मुंबईतील अँटिलिया या निवासस्थानी सेलिब्रिटींसह विविध क्षेत्रातील मान्यवरांची उपस्थिती पाहायला मिळत आहे. त्यामध्ये, राजकीय नेत......पान २ वर

दैनिक
# महाराष्ट्र सम्राट
सम्राट अनेक परंतु बातम्यांचा एकच!®
मुंबई, मुंबई उपनगर, ठाणे, नवी मुंबई, रायगड, पालघर, पुणे
संपादक : चंद्रकांत भोईटे



मुख्यमंत्री लाडकी बहिण योजना (विशेष)
...पान ४ वर



ई-पेपरसाठी नियमित पहा...
ePaper PDF
www.maharashtrasamrat.com

**तापमान**
कमाल ३६° से | किमान २९° से

**बाजार**
सोने ७३,२८० | चांदी ९३,६८०

**डोकं खाजवा** –अशोक सुतार



तुम्ही अशा पक्षात जाणार आहात, जरी तुम्ही कोट्यवधींचा घोटाळा केला असला तरी तो माफ होईल.

**थोडक्यात घडामोडी**

### आयुक्तालय हद्दीत पूर्वपरवानगी शिवाय पॅरा ग्लायडर, ड्रोन, मायक्रो लाईट एअरक्राफ्ट वापरास मनाई

ठाणे – सुरक्षेच्या दृष्टीने आणि अतिरेकी आणि दहशतवादी आणि असामाजिक प्रवृत्त्यांपासून धोका निर्माण झाल्याने ठाणे विशेष शाखेचे पोलीस उप आयुक्त सचिन गोरे यांनी शासनाच्या अधिसूचनेनुसार ठाणे आयुक्तालयाच्या हद्दीत पूर्व परवानगी शिवाय रोमोटद्वारे ड्रोन, मायक्रो लाईट एअरक्राफ्ट, पॅरा ग्लायडर, सारख्या वस्तूंचा वापरास मनाई आदेश मंगळवार(ता–९ जुलै) रोजी काढले आहेत. १२ जुलै, २०२४ ते ९ सप्टेंबर, २०२४ पर्यंत ६० दिवसांची बंदी करण्यात आलेली आहे. देशातील विविध ठिकाणी अतिरेकी/ दहशतवादी, असामाजिक पटक यांनी रिमोटद्बारे नियंत्रित होणाऱ्या ड्रोन अथवा हवाई क्षेपणास्वाद्वारे हल्ले केल्याच्या घटना घडल्या आहेत. प्राप्त परिस्थितीमध्ये ठाणे शहर पोलीस आयुक्तांच्या नियंत्रणाखाली असलेल्या भागात अतिरेकी/ दहशतवादी असामाजिक घटक हे पॅरा ग्लायडर, रिमोटद्वारे कंट्रोल होणाऱ्या ड्रोन अथवा मायक्रो लाईट एअरक्राफ्टचा वापर करून हल्ला करु शकतात, अशा कारवायांवर आळा घालणे आवश्यक आहे. हे प्रकार रोखण्यासाठी तातडीने अशा हवाई प्रकारांचा वापर करण्यास मनाई आदेश ठाणे पोलीस आयुक्तालयाचे विशेष शाखेचे पोलीस उप आयुक्त सचिन गोरे यांनी जरी केलेले आहेत. या ठाणे पोलिसांच्या मनाई आदेशामुळे आता आयुक्तालयाच्या हद्दीत पॅरा ग्लायडर, ड्रोन, मायक्रो लाईट एअरक्राफ्ट यांचा वापर केल्यास मनाई आदेशाचे उल्लंघन केल्यास शिक्षेस प्राप्त राहणार आहे.

# मराठा आरक्षणाची सुनावणी ऑगस्टपर्यंत तहकूब

**मुंबई : एकीकडे मराठा समाजाला ओबीसीतून आरक्षण देण्याच्या मागणीसाठी उपोषणकर्ते मनोज जरांगे पाटील यांनी आपली लढाई सुरू केली असून शांतता रॅलीच्या माध्यमातून ते मराठा समाजाची भेट घेत आहेत. हिंगोलीतून आपल्या दौऱ्याची सुरुवात केल्यानंतर मनोज जरांगेंची रॅली आज धाराशिवमध्ये दाखल झाली आहे. तर, दुसरीकडे राज्य सरकारने मराठा समाजाला दिलेल्या १० टक्के आरक्षणाची कायदेशीर लढाई सुरू असून आज मुंबई उच्च न्यायालयात याबाबत सुनावणी झाली.**



### ५ ऑगस्टपासून नियमीत सुनावणी

मराठा आरक्षणाबाबतच्या सर्व याचिकांवर ५ ऑगस्टपासून नियमित सुनावणी घेण्याचं हायकोर्टाकडून निश्चित करण्यात आलं आहे. त्यामुळे, मराठा आरक्षणावरील कायदेशीर पेच सुटण्यास आणखी वेळ द्यावा लागणार आहे.

मराठा आरक्षणाला विरोध करणाऱ्या याचिकांवर सरकारच्यावतीने राज्य मागास आयोगाकडून बाजू मांडण्यात येत आहे. मात्र, आयोगाचे वकील विदेशात असल्याने मुदतवाढ मिळावी, अशी मागणी आयोगाच्यावतीने करण्यात आली होती. त्यावर, उच्च न्यायालयाने तीन आठवड्यांची मुदतवाढ आयोगाला देण्यात आली आहे. तर, ५ ऑगस्टपासून पुढील सुनावणी होणार आहे.
महाराष्ट्रातील सामाजिक आणि शैक्षणिकदृष्ट्या मागासवर्गीय श्रेणीतील मराठ्यांच्या नोकऱ्या अन् शिक्षणातील १० टक्के कोट्याच्या आव्हानावर मुंबई उच्च न्यायालयात आज पुन्हा सुनावणी पार पडली. मराठा आरक्षणाला स्थगिती देण्याची मागणी करणाऱ्या याचिकांवर सध्या न्यायालयात सुनावणी सुरू आहे. त्यावर, आज न्यायालयाने याचिकाकर्ते व राज्य सरकार यांना महत्त्वाचे निर्देश दिले असून पुढील सुनावणी ऑगस्ट महिन्यापर्यंत तहकूब केली आहे. त्यामुळे, आता, (पान २ वर)

### आरक्षणासाठी मनोज जरांगेंची शांतता रॅली

दरम्यान, राज्य सरकारने एसईबीसी कोट्यातून मराठा समाजाला दिलेलं १० टक्के आरक्षण कोर्टात टिकणार नाही, असे म्हणत मराठा समाजाने आणि उपोषणकर्ते मनोज जरांगे पाटील यांनी ओसीबीमधूनच मराठा समाजाला आरक्षण देण्याची भूमिका घेतली आहे. त्यासाठी, जरांगे यांनी सगेसोयरेची अंमलबजावणी करावी आणि ५७ लाख नोंदी सापडलेल्यांना कुणबी प्रमाणपत्र द्यावे, अशी मागणी जोर लावून धरली आहे. त्याच, अनुषंगाने त्यांची शांतता रॅली सुरू असून आज ते धाराशिव दौऱ्यावर आहेत.

# आरोपी मिहीर शाहाला 16 जुलैपर्यंत पोलीस कोठडी

**वरळी: वरळीमध्ये एका कारने दुचाकीला धडक दिली होती.दरम्यान या अपघातात एका महिलेचा मृत्यू झाला. ज्याच्याकडून हा अपघात झाला होता, तो काही दिवस फरार होता.त्या आरोपीला शहापूरमधून पोलिसांनी अटक केली. या हिट एड रन प्रकरणातील मुख्य आरोपी मिहीर शाहाला अखेर १६ जुलैपर्यंत पोलिस कोठडी सुनावण्यात आली आहे. शिवडी कोर्टाने हा निर्णय दिला आहे. पोलिसांनी मिहीरसाठी पोलिस कोठडीची मागणी केली होती. आणि अखेर मिहीरला पोलिस कोठडी देण्यात आली आहे.** (पान २ वर)



### मिहीर राजेश शहा राक्षसच

गुन्हेगार असेल तर गुन्हा दाखल करुन जेलमध्ये टाकू शकता, पण राक्षस असेल तर काय करायचं? हा मिहिर राजेश शहा राक्षसच आहे. एवढं भयानक कृत्य आहे, की मनाला धक्का बसतो. ६० तासांनी तो सापडला. सीसीटीव्ही फूटेज होतं, मग इतका उशीर का? मी पोलिसांकडे बोट दाखवणार नाही, ते तपास करत होते. पण गृहमंत्री काही बोलले नाहीत. आता शिक्षा काय होते हे पाहायला हवं. जुहूतल्या ग्लोबस तापस बारवर बुलडोझर नेताय, पण मिहीरच्या घरावर बुलडोझर चालणार आहे का? यांना न्याय देण्याची मागणी आहे. देशातील कठोरात कठोर शिक्षा व्हायला हवी असंही आदित्य ठाकरे म्हणाले.



राक्षस मिहीरला कोळीवाड्यात भरचौकात सोडा

### पीडित कुटुंबाला सरकारकडून १० लाखांची मदत–शिंदे

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज मुंबईत कोस्टल रोडची पाहणी केली. या पाहणीनंतर त्यांनी माध्यमांशी संवाद साधला. यावेळी बोलताना त्यांनी विविध विषयावर त्यांची भूमिका स्पष्ट केली. यावेळी त्यांना वरळी अपघाताबाबत तसेच पीडित कुटंबाला आर्थिक मदत देण्याबाबतही विचारण्यात आलं. यासंदर्भात बोलताना, आम्ही पीडित कुटुंबाला १० लाख रुपयांची आर्थिक मदत देऊ, अशी घोषणा मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केली.

### अस्लम शेख यांनी केली होती मदतीची मागणी

तत्पूर्वी वरळी हिट अँड रन प्रकरणातील पीडित महिलेच्या कुटुंबाला आर्थिक मदत देण्याची मागणी काँग्रेस नेते अस्लम शेख यांनी विधान भवनात केली होती. वरळी हिट अँड रन प्रकरणात मृत पावलेल्या महिलेच्या कुटुंबीयांना शासनातर्फे अद्याप कोणतीही मदत मिळालेली नाही. एकीकडे शासन कोट्यवधी रुपये वाटत आहे. मात्र जे कोळी बांधव या मुंबईचे भूमिपुत्र आहेत, त्यांच्या घरातील महिलेचा अपघाती मृत्यू घडून २ दिवस झाल्यानंतरही सरकारकडून मदत मिळणार नसेल तर 'जनसामान्यांचं सरकार' ही बिरुदावली मिरवण्याचा सरकारला अधिकार आहे का, याचा सरकारने विचार करावा, असे ते म्हणाले होते.

### शिंदे गटाकडून राजेश शहांची हकालपट्टी

पुण्यातील पोर्शे प्रकरण चर्चेत असतानाच मुंबईत वरळी येथे 'हिट अँड रन'ची हृदय हेलावणारी घटना रविवारी पहाटे घडली होती. या प्रकरणातील आरोपी मिहीर शहाचे वडील आणि शिवसेनेच्या शिंदे गटाचे उपनेते राजेश शहा यांची पक्षाच्या उपनेतेपदावरून हकालपट्टी करण्यात आली आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या आदेशानंतर बुधवारी त्यांना पदावरून मुक्त करण्यात आले.
वरळीतील ऑट्र्या मॉलजवळ सुझुकी ॲक्सेसवरून जाणाऱ्या एका कोळी दाम्पत्याला रविवारी पहाटे साडेपाचच्या सुमारास भरधाव वेगाने येणाऱ्या बीएमडब्ल्यू गाडीने उडवले. या घटनेत कावेरी नाखवा (४५) या महिलेचा मृत्यू झाला, तर तिचे पती प्रदीप नाखवा जखमी झाले. या अपघातात बीएमडब्ल्यूने कावेरी नाखवा यांना जवळपास शंभर मीटरपर्यंत फरफटत नेले होते. ही बीएमडब्ल्यू पालघरमधील शिवसेनेच्या शिंदे गटाचे उपनेते राजेश शहा यांचा मुलगा मिहिर शहा (वय २४) चालवत होता. मद्यधुंद अवस्थेत त्याने ही कार चालवल्याचे पुढे आले असून याप्रकरणी पोलिसांनी त्याला अटक केली आहे.

# मुरबाड तालुक्यात ४० गाव/ पाडे टँकरमुक्त





ठाणे – जिल्हा परिषद ठाणे अंतर्गत जल जीवन मिशन व विविध उपक्रमांच्या माध्यमातून मुरबाड तालुक्यात सन २०२० ते २०२४ या पाच वर्षात एकूण ४० गाव/ पाडे टँकरमुक्त करण्यात आले आहे. ग्रामीण भागातील ग्रामस्थांना पाणी मिळावे यासाठी संपुर्ण जिल्ह्यात जल जीवन मिशनची ७२० एकूण काम हाती घेण्यात आले असून ही काम लवकर पुर्ण करण्यासाठी जिल्हा परिषद ठाणे विशेष प्रयत्न करत आहे.
कार्यकारी अभियंता प्रदिप कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली व पंचायत समिती मुरबाड गट विकास अधिकारी श्वेता पालवे यांच्या सहकार्याने, जल जीवन मिशन व विविध उपक्रमांच्या माध्यमातून मुरबाड तालुक्यात एकूण ४० गाव/ पाडे टँकरमुक्त करण्यात आले आहेत. यासाठी उप अभियंता जगदिश बनकरी यांनी विशेष प्रयत्न केले आहेत. जल जीवन मिशन अंतर्गत मुरबाड तालुक्यात एकूण २०६ कामे असून शाश्वत जल स्त्रोतामार्फत ४८ इतक्या ठिकाणी पाणी पुरवठा सुरू करण्यात आला आहे. तालुक्यातील जल जीवन मिशनची १५८ काम प्रगतीपथावर आहेत ही कमीत कमी वेळेत पुर्ण करण्याचे नियोजन करण्यात आले आहे. मुरबाड तालुक्यातील खेवारे, मांडवत, मेर्दी, लोट्याचीवाडी, वाघवाडी, दुर्गापूर, मोखवाडी, दांडवाडी, वाघवाडी (दुर्गापुर), भावर्थेपाडा, धानिवली, ब्राम्हणगाव, टेमगाव, रामपुर, महाज, न्हावे, बांगरवाडी (करचोंडे), बांगरवाडी (कडूशेत), पैशाखरे, प्रधानपाडा, गोड्याचापाडा, खडकपाडा, उमरोली खुर्द, फांगणे, पेजवाडी, (पान २ वर)

सन २०२० ते २०२४ या पाच वर्षात ८६ टंचाईग्रस्त गाव/ पाडे होते, यावर्षी जल जीवन मिशन व विविध उपक्रमांच्या माध्यमातून एकूण ४० गाव पाडे कायमस्वरुपी टँकरमुक्त करण्यात आले आहेत. प्रगतीपथावरील ४६ कामाचे विशेष नियोजन करण्यात आले आहे.
**– मुख्य कार्यकारी अधिकारी रोहन घुगे**

जल जीवन मिशन व विविध उपक्रमांच्या माध्यमातून न्हावे गाव कायमस्वरुपी टँकरमुक्त झाले. ही आमच्यासाठी खरोखरच आनंदाची बाब आहे.
**– संरपच जगदिश हिंदूराव**

गावात पाणी पुरवठा सुरळीत व्हावा यासाठी अधिकारी व कार्मचारी यांनी वेळोवेळी पाठपुरावा करून काम उत्तम व्हावे यासाठी सहकार्य केले. आमच्या महाज गावात पहिल्यांदा नळाद्वारे पाणी पुरवठा सुरू झाल्यामुळे गावात आनंद साजरा केला गेला. विशेष करून महिलांना पाणी भरण्यासाठी लागणारा वेळ विविध रोजगार मिळवण्यासाठी झाला.
**– ग्रामस्थ महाज, प्रदिप शिरोसे**



गेल्या दोन वर्षापासून दिव्यांग व्यक्ती अनुदानापासून वंचित

खा. नरेश म्हस्के यांनी घेतली आयुक्तांची भेट

# दिव्यांगांचे अनुदान वितरित करण्याबाबत आयुक्त सकारात्मक

ठाणे – राज्य शासनाच्या धोरणानुसार दिव्यांग व्यक्तींचा सर्वांगीण विकास व्हावा यासाठी महापालिकेच्या माध्यमातून दारिद्र्य निर्मुलन समिती अंतर्गत विविध दिव्यांग कल्याणकारी योजना आणि महिला व बालकल्याण समितीच्या वतीने विविध योजना राबविण्यात येतात. मात्र गेल्या दोन वर्षापासून दिव्यांग व्यक्तींना देण्यात येणारी अनुदानाची रक्कम वितरित करण्यात आली नव्हती. या पार्श्वभूमीवर खासदार नरेश म्हस्के यांनी महापालिका आयुक्त सौरभ राव यांच्याशी याबाबत चर्चा केली. सदरचे अनुदान लवकरच वितरित करण्याबाबत कार्यवाही केली जाईल असे आयुक्तांनी या चर्चेत नमूद केले.
दिव्यांग व्यक्तींसाठी राबविण्यात येणाऱ्या कल्याणकारी योजनांसाठी दरवर्षी महापालिकेतर्फे एकूण बजेटच्या पाच टक्के इतकी रक्कम राखीव ठेवली जाते. यामध्ये दिव्यांग व्यक्तींना स्वयंरोजगाराचे साधन उपलब्ध व्हावे यासाठी स्टॉलचे वाटप, दिव्यांग स्कूटर, दिव्यांग विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती, दिव्यांगाच्या व्यायामशाळा, परिवहन सेवेमध्ये १०० टक्के सवलत व बेरोजगार दिव्यांगासाठी रु. २४,०००/- इतके अनुदान वितरित करण्यात येते. परंतु मागील दोन वर्षापासून सदरचे अनुदान बंद झाले असल्यामुळे दिव्यांगांना अनेक समस्यांना सामोरे जावे लागत आहे. याबाबत धर्मवीर दिव्यांग सेनेच्या पदाधिकाऱ्यांनी (पान २ वर)



पुढच्या महिन्यात दहीहंडी उत्सव आहे ठाणे शहरात मोठ्या उत्सवात हा सण साजरा केला जातो. या दहीहंडी उत्सवासाठी ठाण्यातील पाचपखाडी येथे ठाण्याचा राजा गोविंदा पथक सध्या जोरदार सराव करत आहे. (छाया – मनोज सिंह)

## सौ.लताजी एकनाथ शिंदे यांच्या वाढदिवसानिमित्त राज्यातील समस्त शिवसैनिकांतर्फे अभिष्टचिंतन... पान १ वर)



# ठाण्यात स्वाईन फ्ल्यूचे तबबल ७० रुगण

**आरोग्य विभागाची चिंता वाढली**

**ठाणे – ठाण्यात स्वाईन फ्ल्यू (एचवनएनवन) तब्बल ७० रुग्ण आढळल्याची धक्कादायक माहिती समोर येत आहे. गेल्यावर्षी संपूर्ण पावसाळ्यात ८७ रुग्ण सापडले होते. मात्र यावर्षी केवळ जून महिन्यातच रुग्णांची संख्या वाढली आहे. महापालिकेचे आयुक्त सौरभ राव यांनी स्वाईन फ्ल्यूच्या पार्श्वभूमीवर खबरदारीच्या सूचना दिल्या आहेत. छत्रपती शिवाजी महाराज रुग्णालयात स्वाईन फ्ल्यूच्या रुग्णांसाठी स्वतंत्र आयसोलेशन वॉर्ड तयार करण्यात आल्याची माहिती ठाणे पालिकेचे माहिती जनसंपर्क अधिकारी रवींद्र मांजरेकर यांनी दिली आहे.**

विशेष म्हणजे २००९ मध्ये हा आजार समोर आला तेव्हा जगभरात एकच खळबळ उडाली होती. भारतातही अनेकांना या आजाराची लागण झाली होती. या आजारामुळे अनेक जण दगावल्याची माहिती समोर आली होती. पण या आजारावर योग्यप्रकारे उपचार घेतला तर माणूस बरादेखील होतो. त्यामुळे काळजी घेणे आवश्यक आहे. दरम्यान, जगभरात लाखो रुग्णांनी या आजारावर मात केली आहे. त्यामुळे नागरिकांनी घाबरुन जाण्याची गरज नाही. (पान २ वर)

### स्वाईन फ्लू आजार नेमका कसा होतो?

स्वाईन फ्ल्यू हा एक संसर्गजन्य आजार असून H1N1 व्हायरसमुळे त्याची लागण होते. २००९ साली थकज ने हा रोग संसर्गजन्य असल्याचे जाहीर केले होते. हा आजार केवळ माणसांमुळे नव्हे तर प्राण्यांमुळे देखील होतो. ज्या व्यक्तीला स्वाईन फ्ल्यूची लागण झाली असेल तो शिंकला अथवा खोकला, तर त्यातून या आजाराचे विषाणू हवेत पसरतात. याचे विषाणू हवेत ८ तासांपर्यंत जिवंत राहू शकतात. या विषाणूंचा निरोगी अथवा स्वस्थ व्यक्तीचे डोळे, नाक, तोंड अथवा त्वचेशी संपर्क आला, तर विषाणूंचे संक्रमण होऊन त्या व्यक्तीलाही स्वाईन फ्ल्यूची लागण होते.



### स्वाईन फ्लयू आजाराची लक्षणे काय?

ताप येणे, हुडहुडी भरणे वा थंड वाजणे, सर्दी होऊन नाक वाहते राहणे, खोकला, घशात खवखव किंवा दुखणे, अंगदुखी तसेच डोके दुखणे, पोटात दुखणे, मळमळ किंवा उलटी होणे, यासाखी लक्षणे स्वाईन फ्लूमध्ये दिसू शकतात. विशेष म्हणजे ६५ वर्षांवरील नागरिक, लहान मुले, गर्भवती महिला, तसेच मधुमेह , किडनीचे विकार असे आजार असणाऱ्यांना स्वाईन फ्ल्यूची लागण होण्याचा धोका सर्वाधिक असतो.

